जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR 2024

लोकमत




कोल्हापुरातील भारती विद्यापीठाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या परिषदेत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचा एच. एम. कदम यांनी सत्कार केला.

# संशोधन समस्यांपासून सुरू होते : डी. टी. शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संशोधनाची सुरुवात समस्यांपासून होत असते, म्हणून संशोधन करावयाचे असल्यास विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानातील उदयोन्मुख ट्रेंडवरील राष्ट्रीय परिषद-२०२४ मध्ये ते बोलत होते.

नवकल्पनांबद्दल जागरूकता देण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ, संशोधन अभ्यासक, विविध विषयांतील विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना व विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करणे, हा याचा उद्देश होता. परिषदेची 'थीम नावीन्यपूर्ण युग' अशी होती.


प्राचार्य डॉ. विजय घोरपडे यांनी स्वागत व परिषदेची प्रस्तावना केली. मशिन लर्निंग विभागाच्या विभागप्रमुख शगुप्ता मुल्ला यांनी आभार मानले. संस्थेचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. व्ही. आर. घोरपडे, उपप्राचार्य डॉ. जे. के. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 APR 2024
लोकमत

# 'घरंदाज सावली'वर उद्या ग्रंथचर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रा. रणधीर शिंदे संपादित 'घरंदाज सावली डॉ. उषा इथापे : कार्य आणि आठवणी' या संपादित ग्रंथाच्या निमित्ताने उद्या, बुधवारी ग्रंथचर्चा होत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात दुपारी तीन वाजता कार्यक्रम होईल.



शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि डॉ. आप्पासाहेब पवार 'कमवा आणि शिका' प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने ही ग्रंथचर्चा होईल. चर्चेत उच्चशिक्षण विभागाचे माजी संचालक प्रा. डॉ. एस. एन. पठाण, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गजानन [illegible], कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, गजानन साळुंखे सहभागी होतील. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. सी. टी. पवार, पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

09 APR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन

## उद्या उद्घाटन, ग्रंथ प्रकाशन; १० ते १४ एप्रिलदरम्यान विविध उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात १० एप्रिल ते १४ एप्रिल २०२४ या दरम्यान फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार, दि.१० रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये सप्ताहाचे उदघाटन होणार आहे. विचारवंत सुधाकर गायकवाड प्रमुख पाहुणे असणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील.




सुधाकर गायकवाड लिखित 'दलित सौंदर्यशास्त्र' ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. ग्रंथावर डॉ. देवानंद सोनटक्के व डॉ. सचिन गरुड भाष्य करणार आहेत.

सप्ताहात महात्मा फुले यांच्या जयंतीदिनी डॉ. रवींद्र ठाकूर यांचे 'महात्मा जोतिराव फुले : व्यक्ती व वाङ्मय' या विषयावर व्याख्यान शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता यूट्यूब चॅनेलवरून सकाळी १०.३० वाजता प्रसारित होईल. तसेच १२ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र येथे वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. विजेत्यांना मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. १२ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता सीमा कांबळे यांचे 'वारसा बाबासाहेबांचा' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये प्रतिमा पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात येईल. उपक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 APR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या शारदाबाई पवार अध्यासनातर्फे परिसंवाद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ शारदाबाई पवार अध्यासन व डॉ. अप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि.१०) रोजी दुपारी ३ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलसचिव डॉ. उषा इथापे यांच्या कार्य-कर्तृत्वाच्या आठवणींचा पट उलगडणाऱ्या 'घरंदाज सावली : डॉ. उषा इथापे कार्य व आठवणी' या प्रा. डॉ. रणधीर शिंदे संपादित ग्रंथावर हा परिसंवाद होत आहे. माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, प्राचार्य किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. कुलगुरू प्रा.डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला १ हजार १९३ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर परीक्षेला १ हजार १९३ विद्यार्थी बसले. त्यापैकी १३८ विद्यार्थी गैरहजर राहिले.

सोमवारी एमए, एमएस्सी बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईन, बीए, बीएड, मास्टर ऑफ आर्टस् योगा, बीएस्सी, एमएस्सी (नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी), म्युझिक, जर्नालिझम आदी १५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये झाल्या. ८ रोजी भरारी पथकाकडून सांगली (३), कोल्हापूर (१०) असे मिळून १३ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR 2024
पुढारी

# महावीर अध्यासनास देसाई यांच्याकडून देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी बाळासाहेब शामराव देसाई, सांगली यांनी ५० हजार रुपये देणगी दिली. देसाई सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अधिकारी पदावर कार्यरत होते. सध्या ते सांगली येथे वास्तव्यास आहेत. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

0 9 APR 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पन्हाळ्याचा पारा ३७ अंशांवर

पन्हाळा : इंद्रजित शिंदे

गतवर्षीपर्यंत उन्हाळ्यात किमान २५ व कमाल ३२ अंश सेल्सियस असे सुखद तापमानाने 'ठंडा ठंडा ..कूल कूल' असलेला पन्हाळा यंदा मात्र ३७ अंश इतक्या उच्चांकी तापमानामुळे होरपळू लागला आहे. पन्हाळगड हे कोल्हापूर शहराच्या सर्वाधिक जवळचे, सह्याद्रीच्या कुशीतील सर्वोत्तम 'हिल स्टेशन' आहे. समुद्र सपाटीपासून ३,१७७ फूट उंचीवरील हे छोटे आणि निसर्गरम्य तसेच थंड 'हॉलिडे डेस्टीनेशन' आहे. उन्हाळ्यात पन्हाळगडाचे तापमान शहर व जवळपासच्या ठिकाणांपेक्षा कमी असते.

येत्या काही दिवसांत कोल्हापूरसह परिसराचे तापमान ४० ते ४३ अंश सेल्सियसवर पोहोचेल, असा अंदाज केंद्रिय हवामान खात्याने वर्तवला आहे. शिवाय, रात्रीच्या तापमानातही वाढ होणार असल्याचे सूचित केले आहे. उष्णतेच्या या लाटेच्या फटक्यातून 'हिल स्टेशन' पन्हाळाही सुटलेला नाही. वाढत्या तापमानामुळे गडाला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्याही कमी झाली आहे.

भक्कम तटबंदीच्या चिरेबंदी कोंदणातील भव्य ऐतिहासिक इमारती, थंड हवेचा आल्हाददायक गारवा, पर्वतराजीचा विहंगम नजारा, तबक आणि नेहरू उद्यानांतील गगनचुंबी सदाहरित वृक्षांवरील पक्ष्यांच्या कर्णमधुर किलबिलाटासह मोरांचा केकारव, कासारी तसेच वारणामाईच्या विस्तीर्ण खोऱ्यांमधील अमर्याद नेत्रसुखद हिरवाई टिपण्यासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक पन्हाळा किल्ल्याला भेट देत असतात.

> उत्तर कर्नाटक तसेच महाराष्ट्रातील विदर्भ आणि इतर काही भागांमध्ये येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट येणार आहे. काही दिवस या भागांमध्ये दिवसाचे तापमान ४० ते ४३ अंश सेल्सियस राहील. रात्रीच्या तापमानामध्येही वाढ होईल. एप्रिल ते जून महिन्यांत किमान १० ते १५ दिवस पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.
>
> - **डॉ. राजीव व्हटकर,**
> समन्वयक, अवकाश संशोधन केंद्र पन्हाळा
> (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

गडावर सरासरी तापमान किमान १३ व कमाल ३० अंश सेल्सिअस असते. कडक उन्हाळ्यातही गडाचे तापमान ३२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले नसल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या हवामानशास्त्र विभागातील नोंदींवरून दिसून येते.

पन्हाळ्यावरील तापमानाचा पारा यंदा अभूतपूर्व अशा ३७ अंशांवर पोहोचला आहे. परिणामी, पर्यटकांची संख्या कमी झाली आहे. सध्या शाळा, महाविद्यालयांच्या परीक्षांचा हंगाम चालू असल्यानेही पर्यटकांचा ओघ मंदावला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR 2024
तरुण भारत

## महावीर अध्यासनाला बाळासाहेब देसाईंकडून एक लाखाची देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी सांगलीतील बाळासाहेब देसाई यांनी ५० हजार रूपयांची देणगी दिली आहे. देसाई हे सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अधिकारी पदावर कार्यरत होते. त्यांनी यापूर्वी देखील ५१ हजार रूपयांची देणगी दिली होती. त्यांची आतापर्यंत १ लाख १ हजार रूपयांची देणगी दिली आहे. देणगी दिल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील डॉ. विजय ककडे यांनी अभिनंदन केले आहे.